**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ**

मध्यवर्ती कार्यालयः हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई-४०० ०१३.
दूरध्वनी क्र. ०२२-४३२२६८२५/४३२२६८२६, ई मेल mlwbpro53@gmail.com / pro.mlwb-mh@gov.in

---

जा.क्र.मका/प्रजवि/२०१९-२०/५ . दि.१० /०४/२०१९

परिपत्रक :

**विषय : अपुर्ण, त्रुटीयुक्त व नियमबाह्य अर्ज न स्विकारणेबाबत.**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजनांचे परिपत्रक व अर्जाचे नमुने मध्यवर्ती कार्यालयातून निर्गमित करण्यात आलेले आहेत. सदर परिपत्रकात योजनांचे नियम, अटी व मुदत स्पष्ट नमूद केलेल्या आहेत. तरी बऱ्याच केंद्रांवर कागदपत्रांची पुर्तता नसलेले व त्रुटी असलेले अर्ज स्विकारले जातात. तसेच गट कार्यालये व विभागीय कार्यालये देखील नियम अटींची पडताळणी न करता आणि कालमर्यादेचे पालन न करता अर्ज मान्यतेसाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर करत असल्याचे निदर्शनास आले आहे.
यासंदर्भात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

- केंद्र प्रमुखांनी अर्ज स्विकारतांना योजनेच्या नियम-अटी व्यवस्थित तपासून घ्याव्यात व कागदपत्रांची पुर्तता संबंधितांकडून करुन घ्यावी त्यानंतरच अर्ज स्विकारावेत. नियमबाह्य, अपुर्ण व त्रुटी असलेले अर्ज स्विकारु नयेत. त्रुटी असलेले अर्ज केंद्रात स्विकारण्यात येत असल्यामुळे योजनेचा लाभ वाटपात खूप विलंब होत असून विहित कालमर्यादेचे पालन होत नसल्याचे दिसून आले आहे.
- सर्व योजनांचे अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख केंद्रांत दर्शनी भागात लिहिण्यात यावी व त्याबाबत जनजागृती करावी. केंद्रांनी विहित मुदतीनंतर अर्ज स्विकारु नयेत. केंद्र, गट व विभागीय कार्यालयांनी विहित मुदतीचे पालन करावे. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्ज बाद करण्यात यावेत.
- साहित्य प्रकाशन अनुदान योजनेचे अर्ज ३० नोव्हेंबरपर्यंत केंद्रात स्विकारावेत व दि.१५ डिसेंबरपर्यंत सदर अर्ज (पुस्तक व बीलासह) मान्यतेसाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जांची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.
- केंद्र संचालकांनी गट कार्यालयाकडे विहित मुदतीत अर्ज सादर न केल्यास किंवा त्रुटी असलेले अर्ज सादर केल्याचे निदर्शनास आल्यास योजनेच्या विलंबासाठी आणि कामगार व कामगार कुटुंबियांच्या होणाऱ्या नुकसानासाठी संबंधित केंद्र संचालकांवर जबाबदारी निश्चित करावी व तसा अहवाल मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

प्र.कल्याण आयुक्त

प्रत :

१. सर्व अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई / का.क्री.भवन, मुंबई
२. सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
३. सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये
४. कामगार विकास अधिकारी, नागपूर / पुणे
५. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
६. सर्व केंद्र प्रमुख व ग्रंथालय कर्मचारी
७. दप्तरी प्रत